# राजीव-रजन आधारघर

कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन-नेरे, पनवेल व राजीव-रजन लाड ट्रस्ट, मुंबई यांच्या सहकार्यातून परावलंबी व्यक्तींसाठी राजीव-रजन आधारघराची स्थापना २०-११-१९९७ रोजी दोन व्यक्तींना घेऊन प्रायोगिक तत्वावर झाली. १९९९ साली अनंत चर्तुदशीच्या दिवशी सात निवासींना घेऊन नव्या इमारतीत (सध्याच्या) आधारघराचे स्थलांतर झाले. सध्या ६७ निवासी असून १८ सेवक कार्यकर्ते आहेत. आतापर्यंत ५४४ स्त्री पुरुषांनी प्रवेश घेतला.

प्रवेश देताााना सांसर्गिक रोग व उपद्रवमुल्य नसणे यांचा विचार केला जातो. नेहमीच प्रतिक्षा यादीवर नाव नोंदणी असते.

सध्या प्रवेश शुल्क रु.१,०००/- अनामत रक्कम रु.७,५००/- मासिक शुल्क रु.४,५००/- व वैयक्तीक खर्चासाठी रु.२,०००/- घेतले जातात. वैयक्तीक खर्चामध्ये दाढी, केस व औषधे यांचा समावेश होतो. वैयक्तीक खर्च संपत आला म्हणजे पुन्हा भरावा लागतो. प्रत्येकाची डॉक्टरी तपासणी आठवड्यातून दोनदा होते.

सकाळी ६ वा. चहा, ८.३० वा. नास्ता व दूध, १२.३० वा. जेवण (शाकाहारी) दुपारी ४ वा. चहा व बिस्किटे, संधयाकाळी ७.३० वा. जेवण असां दैनंदिन कार्यक्रम असतो.

0000000